NES High School, Bhandup
IV Preliminary Examination

Date : 20-02-2019
Std. : X Div. ____
Roll No.______

Sub : Marathi
Pages : 07

Marks : 100
Time : 3 Hrs.

## विभाग १ ः गदय

प्र.१ अ)पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

कृती-१ आकलन कृती (०२)

शाळेतील प्रयोगातून लेखकाला समजलेल्या दोन गोष्टी

१. [ ] २. [ ]

एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करून दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे वघून ते म्हणाले, "माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल." एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं. आयुष्याचं फार मोठ तत्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरू शकेन भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री.मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाचा जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरून ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे, प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाच क्षण न् क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे 'माझे संस्कार केंद्र' डोळयांसमोर उभे राहते मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागतो.

कृती-२

१)व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी शिक्षकांनी दिलेल्या दोन गोष्टी ः (०१)

१. [ ] २. [ ]

२) आयुष्याच्या उभारणीसाठी शिक्षकांनी दिलेली शिदोरी ः (०१)

१. [ ] २. [ ]

कृती-३ व्याकरण कृती (०१)

१) शुद्धलेखन नियमांनुसार लिहा.

१.संघर्प ः [ ] २.शैक्षणीक ः [ ]

२) खालील विशेपांसाठी उता-यातील विशेषणे शोधून लिहा. (०१)

१. ............... शिदोरी २. ............... दारिद्र्य

Scanned by CamScanner

कृती-४ स्वमत

'आई - पहिले संस्कार केंद्र' याविषयी तुमचे मत मांडा. (०२)

प्र.१आ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

कृती-१

लेखकाच्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचे चार पैलू (०२)

लेखकाच्या वडिलांच्या व्यक्तिमत्त्व

१. [ ] २. [ ] ३. [ ] ४. [ ]

त्यानंतर एक आनंदाची गोष्ट घडली. माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली. माझ्या आई-वडिलांना वाय.एम.सी.ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार ऐकू येऊ लागले, ते ऐकून त्यांना आनंद वाटे. माझे वडील स्वतः व्हॉलीबॉल चॅम्पियन होते. त्यामुळे ते मला खेळात नेहमीच प्रोत्साहन देत. एकदा दुपारी त्यांना जेवणाचा डबा घेऊन गेलो असताना त्यांनी मला दुकानात नेले व सहा रूपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. ती बॅट पाहून माझा आनंद गगनात मावेना. मी तसाच ती बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. त्या वेळेस वडिलांचा मासिक पगार अवघा चोवीस रूपये होता. माझे वडील अभ्यास व शाळा यांबाबतीत फारच कडक असत. एकदा मी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहत बसलो होतो. वडील घरी आले तेव्हा त्यांनी मला पाहिले व संतापाने छडया मारत शाळेत नेऊन बसवले. त्या क्षणापासून मी शाळा मात्र कधीच चुकवली नाही.

कृती-२ चौकटी पूर्ण करा. (०२)

१) लेखकाच्या आयुष्यात घडलेली आनंदाची गोष्ट : [ ]

२) लेखकाच्या आईवडिलांना ऐकून आनंद वाटे ती गोष्ट : [ ]

कृती-३

खालील चित्राकृतींमधील समानार्थी शब्दांच्या जोडया जुळवा. (०२)

खेळ आनंद हर्ष वेतन पगार क्रिडा प्रोत्साहन उत्तेजन

कृती-४ स्वमत

'मैदानी खेळ- एक आवश्यक व्यायाम' यावर तुमचे मत लिहा. (०२)

Scanned by CamScanner

प्र.१ई) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

कृती-१

पुढील वाक्ये उताऱ्याआधारे पूर्ण करा. (०२)

१. १५०० मुलांसाठी दुपारचं .............................

२. आधी खिचडी ठरली होती, ............................

'अक्षयपात्र' फाऊंडेशनचे सगळ्यात पहिलं किचन सुरू झालं बंगळुरूमध्ये २००० साली. सुरुवात अगदी साधी होती १५०० मुलांसाठी दुपारचं जेवण द्यायचं असं ठरलं. आधी खिचडी ठरली होती, मग सांबारभात बनू लागला. पसारा हळूहळू वाढत गेला, आणि आज भारतातल्या ११ राज्यांमध्ये २४ ठिकाणी 'अक्षयपात्र' फाऊंडेशनची किचन्स आहेत. हा सर्व पसारा 'इस्कॉन' च्या वतीने चालवला जातो. संन्यासाची दीक्षा घेतलेले साधू, बड्या कंपन्यांचे सीईओ व कॉर्पोरेट क्षेत्रातली मंडळी ही स्वयंपाकघर चालवतात. किचनचं संपूर्ण काम वाफेवर चालतं. तांदूळ, डाळ सगळं वाफेच्या ऊर्जेवर शिजतं. अक्षयपात्रचं हे स्वयंपाकघर म्हणजे तीन मजली टोलेजंग इमारत आहे. त्याच्या तिन्ही मजल्यांवर किचनचं काम चालतं.

कृती-२

पुढील उताऱ्यात आलेले चार इंग्रजी शब्द लिहा. (०२)

१. ____ २. ____ ३. ____ ४. ____

कृती-३

खालील शब्दांची अनेकवचनी रूपे लिहा. (०२)

१. क्षेत्र : ____ २. इमारत ____ ३. काम: ____ ४. मजला: ____

कृती-४ स्वमत

एक विद्यार्थी म्हणून समाजासाठी तुम्ही काय करू शकता याविषयी तुमचे मत लिहा. (०२)

## विभाग २ : पद्य

प्र.२ अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा. (०२)

कृती-१ १) मुठीमध्ये जे नाही : ____ २) शिरेमध्ये जे नाही : ____

३) जीव असा आहे : ____ ४) जवानाचे पाऊल असे आहे: ____

Scanned by CamScanner

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावे कळेना
नाही कव्यचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किर्ती हा लहान,
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान,
वर घोंघावे वंवारा
पुढे कल्लोळ धुराचे,
धडधडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे,
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळयांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण
दीनदुबळयांचे असे
तुला एकच औक्षण

कृती-२ ए)

एका वाक्यात उत्तरे लिहा. (०२)

१. कवयित्रीला सैनिकासाठी कशाची ज्योत पाजळावीशी वाटत?

२. कवयित्रीला काय डोळे भरून पाहावेसे वाटते ?

कृती-३

'जीव ओवाळावा तरी जीव किर्ती हा लहान तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी शान' यातील आशय स्पष्ट करा. (०२)

कृती-४

विदयार्थी आणि देशसेवा या विपयावर तुमचे मत लिहा. (०२)

प्र.२आ) दिलेल्या मुददयांच्या आधारे पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेसंवंधी कृती पूर्ण करा. (०८)

रंग मजेचे रंग उदयाचे

किंवा

योगी सर्वकाळ सुखदाता

१. प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री (०१)
२. कवितेचा रचनाप्रकार (०१)
३. कवितेचा काव्यसंग्रह (०१)
४. कवितेचा विपय (०१)
५. कवितेतील आवडलेली ओळ (०२)
६. कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (०२)

प्र.२इ) खालील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा. (०२)

"हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट"

Scanned by CamScanner

## विभाग ३ : स्थूलवाचन

प्र.३रा खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. (०६)

१. कवीने जाता अस्ताला मधील पणतीच्या प्रतीकातून काय सूचित केले आहे ?

२. या वाळवंटी प्रदेशाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

## विभाग ४ : भाषाभ्यास

प्र.४अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

१) १. पुढील अलंकार ओळखून लिहा. (०२)

१) नरवर कृष्णासमान जगी या नसे

२) खालील समासाचा विग्रह करून प्रकार लिहा.

खरेखोटे

२) १. पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखून प्रकार लिहा. (०२)

"कोण रे तुम्ही, इथे काय करत आहात ?"

२. अव्ययांचा प्रकार ओळखून लिहा.

१) मी व माझा भाऊ झाडाखाली बसलो.

२) वा ! किती भरभर चालतोस.

३) 'सामानसुमान' यासारखे ४ जोडशब्द लिहा. (०२)

१. ______ २. ______ ३. ______ ४. ______

४) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (०२)

१. युद्ध : ______ २. आयुष्य : ______

३. कार्य : ______ ४. देश : ______

५) खालील शब्दसमुहासाठी एक शब्द लिहा. (०२)

१. काव्य लिहिणारा: ______ २. अभिनय करणारा : ______

---

प्र.४आ) भाषिक घटकांवर आधारित कृती

१) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा. (०२)

१. भिकाऱ्याला शाली कशा शोभतील (विधानार्थी करा)

२. सुट्टीत भरपूर वाचन करावे. (आज्ञार्थी करा)

२) तक्ता पूर्ण करा. (०२)

| शब्द | मूळ शब्द | सामान्य रूप |
|---|---|---|
| १. आचाऱ्याने | | |
| २. शाळेला | | |

Scanned by CamScanner

३) खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत योग्य ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा. (०२)

(आर्जव करणे, खूणगाठ बांधणे, भुरळ पाडणे)

१. सहलीला जाण्यासाठी मुग्धाने वडिलांना अनेकदा विनंती केली.

२. मोठेपणी गायक होण्याचा अथर्वने ठाम निश्चय केला होता.

४) शब्दसंपत्ती

१) गटात न बसणारा शब्द ओळखा. (०१)

अ) माता, माऊली, जनक, जननी

आ) गगन, आकाश, मेघ, नभ

२) खालील शब्दाचे दोन भिन्न अर्थ लिहा. (०१)

[ ] ← कर → [ ]

३) खालील शब्दांतील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.
(डोंगर व पायथा हे शब्द सोडून) (०१)

डोंगरपायथा : ............... ...............

५) लेखननियमांनुसार लेखन

अ) खालीलपैकी अचूक शब्द ओळखा. (०१)

१. वैशिष्ट / वैशिष्टय / विशिष्टय / वैषिश्टय

२. सुर्यकिरण / सूर्यकिरण / सूर्यकीरण / सुर्यकीरण

विभाग : ५

प्र.५ अ) १) पुढील कृतीनुसार कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. (०७)

१.

| |
|---|
| माननीय शिक्षणाधिकारी<br>शिक्षण विभाग, एम् वॉर्ड<br>चेंबूर, मुंबई : ४०० ०७४. |
| मुख्याध्यापक या नात्याने विदयार्थ्यांचे परीक्षाकेंद्र बदलून देण्याची विनंती पत्र |

किंवा

२. लहान बहिणीला अभ्यासाविषयी मार्गदर्शन करणारे पत्र लिहा.

२) सारांशलेखन

विभाग १ गदय विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा. (०५)

Scanned by CamScanner

प्र.५आ) खालील कृती सोडवा. (०६)

१) खालील शब्दांवरून आकर्षक जाहिरात तयार करा.

| | |
|---|---|
| संगणक वर्ग | खास सवलत |
| काळाची गरज | तंत्रज्ञानाशी मैत्री |

प्रवेश मर्यादित

२) कथालेखन

खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा. (०६)

दोन बोके-लोण्याचा गोळा मिळणे -वाटणीवरून भांडण- माकडाचे तराजू घेऊन येणे - वाटणी करून देण्याच्या निमित्ताने स्वतःच लोणी खाणे - दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ.

प्र.५ ई) लेखनकौशल्य

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (०८)

१) कोसळलेल्या झाडाचे आत्मवृत्त

पूर्वीचे दिवस- छान रोपटे - मोठे होणे - पशूपक्ष्यांना आश्रय - सावली - मोठे वादळ - कोसळणे - समाधान.

२) सूर्य उगवला नाही तर...

भयंकर कल्पना- सृष्टीचक्रावर परिणाम - हिमयुग - जीवसृष्टी नष्ट होईल - अंधार - सूर्य हा जीवनदाता- ही कल्पनाच नको.

.........

Scanned by CamScanner